ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5134. Licence No. 53.

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख १८ ऑक्टोबर, १९६१ | अंक २०



# औद्योगिक क्षितिजावरील नवा तारा.....

## खाणींच्या उपक्रमांतील नवें अभिधान:

# गो ग टे

कच्च्या लोखंडाच्या निर्गतींत दसपट वाढ झाली....
वाहनांचा काफिला उभारून नवी वाहतूक शाखा सुरू केली....
किनाऱ्यावरून आगबोटींत माल चढविण्यासाठीं स्वतंत्र
कंपनीची स्थापना केली....

**ही सर्व चार वर्षांच्या अल्पावधींतील किमया !**

खाणींच्या व्यवसायांत अगदीं नव्यानें पदार्पण केलेल्या

## गोगटे माइन्सची

कौतुकास्पद प्रगति

आतां हें महाकाय बालक प्रगतीचें आणखी एक असामान्य पाऊल पुढें टाकीत आहे......
किनाऱ्यापासून आगबोटीपर्यंत मौल्यवान् खनिजाची वाहतूक करण्यासाठीं

**कृष्णा** आणि **कोयना**

**ह्या स्वयंचलित नौका सुरू करीत आहे.**

महाराष्ट्राच्या जीवनाला आधारभूत असलेल्या नद्यांचें भावनापूर्वक नामाभिधान केलेल्या
ह्या नौकांचें समुद्रांत समारंभपूर्वक वितरण

**सौ. वेणूताई चव्हाण** आणि **सौ. उषाताई गोगटे**

ह्यांचे हस्तें रविवार, दि. २२ ऑक्टोबर, १९६१ ह्या दिवशीं होणार आहे.

**श्री. यशवंतराव चव्हाण**

हे अध्यक्षस्थान स्वीकारून ह्या उपक्रमाला शुभाशीर्वाद देतील.

गगनचुंबी कल्पनेच्या भरारींतील प्रकाश-बिंदूचें आतां देदीप्यमान, चमकदार ताऱ्यांत रूपांतर झालें आहे. खाणींच्या खडतर, बिकट, अशा उपक्रमास उत्कट उत्कर्ष प्राप्त होण्याचें तो विश्वासपूर्वक भविष्यकथन करीत आहे.

## गोगटे माइन्स

टिळकवाडी, बेळगांव

# अर्थ

बुधवार, ता. १८ ऑक्टोबर, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अन्नधान्याचें जगांतील उत्पादन

१९६०-६१ सालांत जगांतील अन्नधान्याच्या उत्पादनांत फक्त एक टक्क्यानें वाढ झालेली आहे. १९६१–६२ सालांतील अन्नधान्यासकट शेतीच्या उत्पादनांत फारशी वाढ होईल अशीं चिन्हेंहि दिसत नाहींत. कारण जगांतील कित्येक भागांत पाऊस-पाणी व हवामान प्रतिकूल परिस्थिति उत्पन्न करीत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेतर्फे १९६१ चा अन्नधान्यविषयक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला असून त्यांत वरील माहिती देण्यांत आली आहे. अहवालांत आणखी अशी माहिती देण्यांत आली आहे कीं, अहवालाच्या वर्षांतील लोक-संख्येच्या वाढीशीं तुलना करतां अन्नधान्याच्या उत्पादनाचें प्रमाण एक टक्क्यापेक्षा कमीच आहे. परंतु शेतीचे गेले दोन हंगाम लक्षांत घेतां अन्नधान्याचें उत्पादन लोकसंख्येच्या मानानें थोडें अधिक वाढल्याचें दिसतें. चीन सोडून अतिपूर्वेकडील देशांचा विचार केला तर असें दिसतें कीं, १९६०–६१ सालांत शेतीचें उत्पादन आणखी तीन टक्क्यांनीं वाढलें. ही वाढ लक्षांत घेतां १९५७–५८ पासून शेतीच्या उत्पादनांत झालेली एकूण वाढ ११ टक्के भरते. १९६० सालीं चीनमधील मुख्य भूमींतील शेतीच्या उत्पादनाला जोराचा तडाखा बसला. चीनमधील शेतजमिनीला एकामागून एका संकटांना तोंड द्यावें लागलें. कांहीं ठिकाणीं पावसाअभावीं दुष्काळ पडला, कांहीं ठिकाणीं मोठीं वादळें झालीं; कांहीं ठिकाणीं जलप्रलय झाले, तर कांहीं ठिकाणीं पिकांवर मोठ्या प्रमाणावर रोगराई पसरली. चीनच्या सरकारनें २७.५ कोटी टन अन्नधान्याचें उत्पादन करण्याचें लक्ष्य ठेवलें होतें. ते तर गांठलें गेलें नाहींच; पण प्रत्यक्ष उत्पादन १९५९ सालापेक्षाहि कमी झालें. १९५९ साल हें पिकांच्या दृष्टीनें फारच वाईट गेलेलें होतें.

---

## भीति उत्पन्न करण्यांत बाँब वर्षाव अयशस्वी

दुसऱ्या महायुद्धांत १९४२ पर्यंत नाझी जर्मनीला मोठ्या प्रमाणावर लष्करी यश मिळालें. फ्रान्सचा पाडाव झाल्यावर युरोपांत जर्मनीची सत्ता दृढमूल झाल्यासारखें वाटलें. ह्या काळांत जर्मन शहरांवर प्रचंड प्रमाणावर बाँब टाकून जर्मन लोकांचें धैर्य खचवून टाकण्याचे प्रयत्न ब्रिटननें केले. परंतु हे प्रयत्न यशस्वी झाले नाहींत. ब्रिटनमधील इंपीरिअल वॉर म्युझिअमतर्फे ह्या बाँब-वर्षावासंबंधीं एक अधिकृत पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. हें पुस्तक १९१९ ते १९४५ ह्या काळांतील जर्मनीवरील हवाई हल्ल्याची तपशीलवार माहिती येते. १,६०० पानें भरतील इतका मजकूर ह्या विषयासंबंधीं प्रसिद्ध करण्यांत आला आहे. पुस्तक तयार होण्यास १० वर्षे लागलीं. ब्रिटननें जर्मनीविरुद्ध केलेले हवाई हल्ले परिणामाच्या दृष्टीनें यशस्वी झाले नाहींत असें मत पुस्तकांत व्यक्त करण्यांत आलें आहे. जर्मन शहरांवर ब्रिटननें केलेल्या प्रचंड भडिमारांत १,८०,००० जर्मन लोक मरण पावले. पण तरीसुद्धां जर्मन लोकांचें धैर्य खचलें नाहीं; अगर युद्ध-साहित्याच्या जर्मनीच्या उत्पादनावरहि फारसा परिणाम झाला नाहीं. हवाई हल्ल्यांत भाग घेतांना ब्रिटनचे ५५,००० वैमानिक मृत्युमुखीं पडले. एकंदरीनें हवाई हल्ल्यांचें धोरण अयशस्वी झालें आणि त्यासाठी माणसें व पैसा ह्यांची जबरदस्त किंमत द्यावी लागली. त्यापेक्षा अमेरिकेनें स्वीकारलेलें हवाई युद्धासंबंधींचें धोरण अधिक फलदायी ठरलें. लष्करी दृष्टीनें महत्त्वाच्या अशा निवडक केंद्रांवर अमेरिकेनें हवाई हल्ले केले. त्यामुळें जर्मनीच्या लढाऊ विमानांची संख्या हळुहळू घटत चालली व अखेर जर्मनीच्या कोणत्याहि भागावर अमेरिकन विमानें निर्धास्तपणें बाँबचा वर्षाव करूं शकलीं.

---

## संयुक्त राष्ट्र संघटनेलाहि पैशाची टंचाई

गेल्या कांहीं वर्षांत संयुक्त राष्ट्र संघटनेचा खर्च हळुहळू वाढत चालला असून १९६२ सालांत तो आणखी वाढणार असल्याचीं चिन्हें दिसत आहेत. संघटनेच्या आमसभेपुढें ठेवण्यासाठीं सर-चिटणिसांची कचेरी अंदाजपत्रक तयार करीत आहे. ह्या अंदाज-पत्रकाप्रमाणें पुढील आर्थिक वर्षांत संघटनेला ७.२५ कोटी डॉलर्स खर्च करावा लागेल. १९६१ सालीं प्रत्यक्ष मंजूर झालेल्या खर्चा-पेक्षा ही रक्कम ५ लाख डॉलर्सनीं अधिक आहे. पांच वर्षांपूर्वी जितका खर्च झालेला होता त्यापेक्षा वरील रक्कम २ कोटी डॉलर्सनीं अधिक आहे. सभासद वर्गणी वेळेवर देत नाहींत. ही बाब विशेष चिंतनीय झाली आहे. संघटनेचीं कांहीं कार्यें सभासदां-कडून आलेल्या वर्गणींतून करावयाचीं असतात. अशा कार्यांसाठी जो पैसा लागतो त्यांत १९६० च्या अखेरीस ३.४६ कोटी डॉलर्सची तूट आली. ह्या तुटीपैकी १.२ कोटी डॉलर्सची तूट अंदाजपत्रकांत अपेक्षिलेल्या पण न आलेल्या वर्गणीमुळें पडली. मामुली कामाखेरीज इतर खास कामासाठी जो खर्च करण्यांत येतो त्या कामीं आर्थिक जबाबदारी उचलण्याची कांहीं देश टाळाटाळ करतात, असेंहि दिसून आलें आहे. ह्या वर्षी पहिल्या सहा महिन्यांत वर्गणीबाबतची परिस्थिति थोडी सुधारली आहे. तरी. पण जून १९६१ अखेर निरनिराळ्या देशांकडून २.५२ कोटी डॉलर्स वर्गणी येणें होती. चालू वर्षअखेर ही तंगी थोडीबहुत कमी होईल अशी अपेक्षा आहे. तरीसुद्धां संयुक्त राष्ट्रसंघटनेला लवकरच पैशाच्या टंचाईला तोंड द्यावें लागेल अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. जून १९६२ पर्यंत संघटनेजवळ असावयाच्या रोख रकमेंत ९ कोटी डॉलर्सची तूट पडण्याचा संभव आहे.

---

## "अर्था" चा दिवाळी अंक

" अर्था " चा नोव्हेंबर, १९६१ मधील पहिला अंक ' दिवाळी विशेषांक ' म्हणून प्रसिद्ध होईल.

### जनता सहकारी बँक लि. पुणें

अहवालाचे वर्षअसेर बँकेचे एकूण सभासद ६९८ असून, बँकेचें भाग भांडवल १,२७,४६५ रुपये आहे. १९५९-६० सालीं हेच आंकडे अनुक्रमें ६५७ व ८९,८२५ रु. असे होते. अहवालाचे सालीं बँकेचें वसूल भाग भांडवल आणि बँकेचें खेळतें भांडवल यांचें अपेक्षित प्रमाण कायम ठेवण्याचे दृष्टीनें बँकेच्या भाग भांडवलांत वाढ करणें संचालक मंडळास जरूर वाटलें. बँकेच्या सभासदांनींहि संचालक मंडळाच्या या धोरणाचें अत्यंत आत्मीयतेनें स्वागत करून संचालक मंडळानें विक्रीस काढलेले भाग भांडवल खरेदी करून बँकेस जरूर असणाऱ्या भाग भांडवलाची पूर्तता केली. नवे सभासद करण्याची आवश्यकता उरली नाहीं. बँकेकडे आतां १६ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. तिनें ९ लक्ष, ६७ हजार रु. चीं कर्जे दिलीं आहेत. बँकेस ८,२३६ रु. नफा झाला.

### दि सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

बँकेचें शेअर भांडवल आतां २३,२८,३५० रु. झालें आहे. ठेवी ६½ लक्ष रु. नीं वाढून त्यांची रक्कम १ कोटि, ४ लक्ष रु. झाली. रिझर्व्ह व इतर फंड ३,४९,८८२ रु. चे आहेत. खेळतें भांडवल ४८ लक्ष रु. नीं वाढून तें २ कोटि, ८ लक्ष रु. झालें आहे. एकूण कर्जे येणें १ कोटि, ४६ लक्ष रु. आहे. कर्जपुरवठा आणि मालाची विक्री ह्यांची सांगड घालण्याच्या दृष्टीनें बँकेनें निश्चित धोरण आखलें. सभासदांनीं सोसायटीमार्फत आपला माल सहकारी खरेदी-विक्री संघाकडे नेला, तरच त्यास भरपूर प्रमाणांत कर्जपुरवठा होईल, असें धोरण अंमलांत आणण्याचा प्रयत्न केला. बँकेस १,६६,३१५ रु. नफा झाला आहे.

### दि तासगांव अर्बन को बँक लि.

बँकेच्या शेअर भांडवलांत ५१० रु. ची आणि रिझर्व्ह फंडांत ५,८५० रु. ची वाढ होऊन त्यांचे आंकडे अनुक्रमें ३९,०५० रु. आणि ६१,०३९ रु. असे झाले. ठेवींत ८६ हजारांची वाढ होऊन त्यांची रक्कम ५,२८,०५६ रु. झाली. कर्जे येणें ३,६२,५५५ रु. आहे. बँकेनें हुंडीव्यवहारांत बरीच प्रगति केली आहे. चालू वर्षी बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा होणार आहे.

### दि बेळगांव पायोनियर अर्बन को. ऑ. बँक लि.

२,९७,९२० रु. भागभांडवल; ५,१२,४७९ रु. रिझर्व्ह फंड; २,२०,५८९ रु. इतर फंड; १७,१२,५४९ रु. ठेवी; १६,२७,२७७ रु. कर्जे; ८०,८९५ रु. नफा, असे ह्या बँकेचे प्रमुख आंकडे आहेत. बँकेची इन्व्हेस्टमेंट ९,१२,७६१ रु. आहे. त्याचा तपशीलवार तक्ता रिपोर्टांत जोडण्यांत आला आहे, हें वैशिष्ट्य उल्लेखनीय आहे. बँकेच्या इमारतीनजिक असलेली इमारत गोडाऊनकरितां विकत घेण्याचा करार करण्यांत आला आहे.

### दि जमखिंडी अर्बन को. बँक लि.

बँकेचें वसूल भांडवल १,८७,६४० रु. असून रिझर्व्ह फंड १,३१,८७४ रु. चा आहे. इतर फंडांत २,१५,१३१ रु. आहेत. ठेवींची रक्कम २२,६४,१३८ रु. आहे. बँकेनें १०½ लक्ष रु. कर्जाऊ दिलेले आहेत. अहवालाचे वर्षी २४,४१२ रु. नफा झाला. नवीन पोटनियमानुसार बँकेच्या स्थळ-सीमेबाहेरील भागीदारांचें भागभांडवल परत करण्यांत येत आहे. सेव्हिंग्ज बँक ठेवी वाढत आहेत.

स्थापना १९११

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा-१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. इलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९६० |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०५,००० |
| ठेवी | रु. | १,२५००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५६,००,००० |

ठेवींवरील नवीन व आकर्षक व्याजाचे दर

१. चालू खातें ०-५० २. सेव्हिंग्ज बँक १-५०

३. स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट ३-००

मुदत ठेवी—१ वर्ष ३-०० २ वर्षे ३-२५

३ वर्षे ३-७५ ५ वर्षे ४-००

रुपये एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई**

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७४-७५

पोस्ट बॉक्स नं. ७४२ तारेचा पत्ता-कार्मबँक

मुख्य कचेरी- ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. | ७२ ,, |
| ठेवी | रु. | १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. | २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका ३०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

विं. द. दाते, कार्यकारी संचालक.

## क्लिअरिंग हाऊसमधून क्लिअर झालेले चेक्स व त्यांची रकम

| केंद्र | १९५८ | | १९५९ | | १९६० | |
|---|---|---|---|---|---|---|
| | चेक्सची संख्या | रकम (लक्ष रु.) | चेक्सची संख्या | रकम (लक्ष रु.) | चेक्सची संख्या | रकम (लक्ष रु.) |
| १. रिझर्व्ह बँकेच्या व्यवस्थेखालील क्लिअरिंग हाउसेस | | | | | | |
| कलकत्ता | ८६,६२,७२३ | ३,३०९,९७ | ९०,४७,१६८ | ३,४६९,६९ | ९४,८६,९२६ | ४,००१,२२ |
| मुंबई | १,५८,८६,२११ | ३,६२१,३९ | १,७२,५५,०३० | ४,०७५,३२ | १,९२,९०,१३३ | ४,४९०,३२ |
| मद्रास | ४४,९९,९१४ | ५२०,५६ | ४८,००,३९९ | ५९२,३२ | ४९,५५,५९३ | ६६५,७० |
| कानपूर | ९,४७,३५४ | १७४,७० | १०,६१,१७० | १९२,४५ | १०,८६,९१७ | २१०,९४ |
| न्यू दिल्ली | १९,२३,८१६ | ३५७,३० | २२,४८,२३९ | ४४०,२१ | २६,०८,०८६ | ५४७,५५ |
| बंगलोर | १२,१०,२०० | १६४,३७ | १३,७०,५०० | २०३,९९ | १४,११,७०० | २१८,६६ |
| नागपूर | ४,००,७८२ | ५८,०४ | ४,३०,६६३ | ६०,९७ | ४,४०,७६६ | ७२,८८ |
| २. इतर क्लिअरिंग हाउसेस ( स्टेट बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद आणि सांगली बँक ह्याचा व्यवस्थेखालील ) | १,०८,३८,११० | १,३६२,१२ | १,२७,४५,६५१ | १,६६७,१० | १,४२,०४,१५९ | १,९२४,४६ |
| एकूण | ४,४३,६९,१२० | ९,५६८,५३ | ४,८९,५८,८२० | १०,७०१,०५ | ५,३५,६४,२८० | १२,१३१,७३ |

## बँकांतील यांत्रिक हिशेब आणि ऑडिटरांचें काम

बँक लहान असो किंवा मोठी असो, तिच्यांत अफरातफर होऊं शकते. तपासणी आणि नियंत्रण ह्यांची कडक योजना केली, तर त्याचा अर्थ बँकेच्या नोकरांवर विश्वास नाहीं, असा केला जातो. सर्व लोक प्रामाणिक असतात, हा समजहि अशा योजनेच्या आड येतो. नियंत्रणें कितीहि महत्त्वाचीं असलीं, तरी तीं चारित्र्याची जागा घेऊं शकणार नाहींत, हें उघड आहे; चारित्र्यामुळेंच बँकांची मजबुती वाढते. मोहाला कुणी बळी पडूंच नये अशी व्यवस्था करतां आली, तर फार बरें होईल. बँकांतून स्वयंचलित यंत्रांचा वापर वाढत्या प्रमाणावर होऊं लागला आहे, त्यामुळें अफरातफरीला नवे मार्ग उपलब्ध झाले आहेत ! ऑडिटरांना जागरूक राहाण्याचीं स्थानें त्यामुळें वाढलीं आहेत. कांहीं झालें तरी बँकेच्या ऑडिटरानें खालील कर्तव्यें पार पाडलींच पाहिजेत:—

( १ ) बोर्डाला त्याचीं कर्तव्यें पार पाडण्यास मदत करणें,

( २ ) कार्यक्षमता वाढविण्यास साहाय्य करणें. बँकेला नुकसानी येऊं नये म्हणून आंखलेलीं धोरणें व नियम ह्यांचे अधिकारी व नोकर काटेकोरपणें पालन करतातना, हें पाहणें; त्यासाठी जरूर ती उपाययोजना करणें.

स्वयंचलित यंत्रामुळें निर्दोषता खासच वाढेल. हीं यंत्रें लबाड असूं शकत नाहींत; त्यांना निष्काळजीपणानें काम करतां येत नाहीं. पण हीं यंत्रें माणसाच्या नियंत्रणानेंच चालावयाचीं असतात; तपासणीची आवश्यकता येथेंच प्रकर्षानें जाणवते. फर्मच्या व्याजाच्या खात्यांतील रकमा स्वतःच्या आणि पत्नीच्या खाजगी खात्यांत जाव्यात अशा रीतीनें पंचकार्डे बदलण्याची हुशारी वॉल स्ट्रीटवरील एका ब्रोकरेज फर्मच्या प्रेसिडेंटनीं दाखविली होती. आठ वर्षांनीं ही गोष्ट उघडकीस आली. हस्तलिखित हिशेबाच्या वह्यांतील हस्ताक्षर कुणाचें आहे तें शोधून काढतां येतें; चुकीच्या नोंदींचा तपास लावतां येतो. पण यांत्रिक हिशेब पद्धतींत कुणी बटण दाबलें, हें कसें सिद्ध करतां येणार ?

यंत्रांच्या वाढत्या वापरामुळें चुका शोधण्याचें नवें तंत्रहि निर्माण होत आहे, पण ऑडिटरांची जबाबदारी आणि कर्तव्यें ह्यांत फरक पडणें शक्य नाहीं.

## पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँका
### ठेवीदार, ठेवी, खात्यावरील सरासरी रकमा

| महिना अखेर | ठेवीदारांची संख्या (हजार) | ठेवींची रकम (लक्ष रु.) | प्रत्येक ठेवीदाराची सरासरी ठेव (रु.) |
|---|---|---|---|
| १९५१ | ४,०९० | १८५,०६ | ४५२·५ |
| १९५२ | ४,४४६ | १९९,८१ | ४४९·४ |
| १९५३ | ४,८३० | २१७,६८ | ४५०·७ |
| १९५४ | ५,०७० | २३१,९५ | ४५७·५ |
| १९५५ | ५,३८४ | २५६,४९ | ४७६·४ |
| १९५६ | ५,९८८ | २९३,५० | ४९०·१ |
| १९५७ | ६,३८५ | ३२२,०८ | ५०४·४ |
| १९५८ | ६,९२० | ३३९,६३ | ४९०·८ |
| १९५९ | ७,७२४ | ३६०,७७ | ४६७·१ |
| १९६० | ८४,४६ | ३८६,८५ | ४५७·९ |

## हिंदी बँकांच्या भारताबाहेरील कचेऱ्या
### ( १९६० )

| देश | शेड्यूल्ड बँका | बिगर शेड्यूल्ड बँका |
|---|---|---|
| एडन | १ | — |
| ब्रि. पूर्व आफ्रिका | १३ | — |
| बर्मा | ७ | — |
| सिलोन | ३ | — |
| हाँगकाँग | ४ | — |
| जपान | २ | — |
| मलाया | ११ | — |
| पाकिस्तान | ४५ | २ |
| सिंगापूर | ५ | — |
| थायलंड | १ | — |
| ग्रेट ब्रिटन | ५ | — |
| एकूण | ९७ | २ |

**सालेममधील कारखाना**—विशिष्ट प्रकारचें पोलाद व इतर मिश्र धातू तयार करण्याचा एक कारखाना मद्रास राज्यांत सालेम जिल्ह्यांत काढण्यांत यावयाचा आहे. कारखाना काढण्याचा परवाना मध्यवर्ती सरकारनें एका खाजगी उद्योगपतीला दिला आहे. ह्या कारखान्यांतून दरसाल ५०,००० टन माल बाहेर पडेल असा अंदाज आहे.

**पुण्यात विटांचा तुटवडा**—पुण्यांतील मुठा नदीला आलेल्या पुरामुळें निर्वासित झालेल्या कुटुंबांची राहण्याची सोय करण्याचें काम महाराष्ट्र सरकारच्या हौसिंग बोर्डानें हातीं घेतलें आहे. पूरग्रस्तांसाठीं बांधण्यांत यावयाच्या इमारतींसाठीं ३ कोटी विटांची जरूरी आहे. पुरवठा मात्र ७० लाख विटांपेक्षा अधिक होऊं शकणार नाहीं.

**सर्व कामगारांसाठीं विमा**—आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. ए. गोपालकृष्णन् ह्यांनीं सर्व कामगारांचा विमा उतरविण्याची एक सामाजिक विम्याची योजना सुचविली आहे. ह्या योजनेंत शेतींत राबणाऱ्या कामगारांचाहि समावेश करण्यांत आला आहे. नियोजन समितीनें योजनेसंबंधीं माहिती जमा करावी असें त्यांनीं सुचविलें.

**मद्रास राज्यांतील तेलाचा शोध**—मद्रास राज्यांत कावेरी नदीच्या खोऱ्यांत तेलाचा शोध करण्यासाठी स्टँडर्ड-व्हॅक्यूम कंपनी आणि भारताचें तेल आणि नैसर्गिक वायुमंडळ ह्यांच्यांत वाटाघाटी चालू आहेत. कंपनीला तेलाचा शोध करण्याचे हक्क मिळाले तर समुद्रकिनाऱ्याजवळील समुद्रांतहि विहिरी खणण्याचें काम तिच्याकडे सोपविण्यांत येईल. राजस्थानांत जेसलमीर भागांतहि तेल शोधण्याबद्दल कंपनीशीं वाटाघाटी चालू होत्या.

**ओखा येथें रेल्वे स्टेशन**—सौराष्ट्रामधील ओखा बंदरांत नवीन रेल्वे स्टेशन बांधण्याचा विचार रेल्वेबोर्ड करीत आहे. रेल्वे स्टेशनासाठी ३० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. स्टेशन बांधण्यांत आल्यास राजकोट विभागांतील तें सर्वांत आधुनिक पद्धतीचें होईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस त्याचें काम संपेल.

**लाकूडकामाचा कारखाना**—दक्षिण भारतांत राजमहेंद्री हें लाकडाचें व लाकूडकामाचें एक मोठें केंद्र आहे. ह्या ठिकाणीं १३ लाख रुपये खर्चून लाकूड टिकाऊ करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. त्याशिवाय इमारतींना लागणाऱ्या दाराच्या व खिडक्यांच्या चौकटीसारख्या वस्तूहि कारखान्यांत तयार करण्यांत येणार आहेत.





दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: -श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति । [ किं. १ रु. ८ आ.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

कौटुंबिक हितगुज
श्री. वा. काळे ह्यांनीं अत्यंत सोप्या व चटकदार भाषेंत लिहिलेल्या लेखमालेनें 'किर्लोस्कर'च्या हजारों वाचकांची पकड घेतली आहे. ह्या लेखमालेंतील निवडक लेख एकत्रित केलेला संग्रह 'किर्लोस्कर प्रेस'तर्फे प्रसिद्ध होत आहे.
पृ. सं. अंदाजें ११२ ] [ किंमत ३ रु.

## रबराच्या खपाचे मानानें उत्पादन नाहीं

भारतांत दरसाल २३,००० टन रबराचें उत्पादन होतें. रबराचा उठाव झपाट्यानें वाढत आहे, पण उत्पादन पूर्वीइतकेंच कायम आहे.

( आंकडे टनांचे )

| वर्ष | उत्पादन | खप |
|---|---|---|
| १९५० | १५,५९९ | १९,१७७ |
| १९५५ | २२,४८१ | ५०,१५१ |
| १९५६ | २३,४४४ | ३४,६६६ |
| १९५७ | २३,७६७ | ३८,६३४ |
| १९५८ | २३,३४८ | ४२,६३९ |
| १९५९ | २३,३९७ | ४७,४६१ |
| १९६० | २४,७९५ | ५६,९१९ |

१९५० सालीं फक्त १,०८० टन रबर आयात झालें होतें; १९६० मध्यें ५७,००० टनांची आयात करावी लागली. थोड्याच वर्षांनीं ती १ लक्ष टनांवर जाईल.

खालील तक्त्यांत कांहीं देशांतील दर माणशीं रबराचा खप दिला आहे. त्यावरून भारताचें स्थान लक्षांत येईल.

| | १९५७ | १९६० |
|---|---|---|
| अमेरिका | १९·२ | २०·६ |
| कॅनडा | ११·९ | १३·३ |
| ऑस्ट्रेलिया | ११·४ | १३·३ |
| ग्रेट ब्रिटन | १०·४ | ११·७ |
| फ्रान्स | ९·४ | १०·५ |
| प. जर्मनी | ८·० | ९·५ |
| रशिया | — | ६·७ |
| नेदरलंडस | ४·८ | ५·९ |
| इटली | ३·६ | ४·४ |
| जपान | ३·५ | ५·० |
| ब्राझील | १·४ | ०·० |
| भारत | ०·१९९ | ०·५५३ |

## राहुरी साखर कारखान्याचा मोसम सुरू झाला

राहुरी सहकारी साखर कारखान्यानें ठरल्याप्रमाणें १९६१–६२ मोसमांतील ऊंस गाळण्यास बुधवार दि. ४ ऑक्टोबर १९६१ रोजीं सकाळीं ९–१५ वाजतां प्रारंभ केला.

## भूतानच्या लोकांना वैद्यकीय मदत

भूतान राज्यानें आपला पहिला पंचवार्षिक कार्यक्रम तयार केला असून त्यांत लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी १·७५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. भूतानमध्यें संधिवात झालेल्या लोकांची संख्या फार असते. म्हणून ह्या रोगाच्या निर्मूलनाकडे विशेष लक्ष देण्यांत आलें आहे. महारोग्यांसाठी एक खास इस्पितळ बांधण्यांत यावयाचें आहे. हिमालयाच्या परिसरांत अशा प्रकारचें हें पहिलेंच इस्पितळ होईल. त्याशिवाय राज्यांतील चार इस्पितळांचा विस्तार करण्याचें कामहि हातीं घेण्यांत येणार आहे. सब राज्यांत देवी टोंचून घेण्याची मोहीमहि लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. भूतानमधील लोकांनाच निरनिराळ्या वैद्यकीय संस्थांत काम करतां यावें म्हणून भूतानमधील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण देण्याची सोय भारत सरकारनें केली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या आहेत.

## तयार कपड्यांच्या बाजारांतील स्पर्धा

पाश्चात्य देशांतून तयार कपड्यांची फार मोठी बाजारपेठ असून ह्या बाजारपेठेंत आतां एक नवा स्पर्धक उतरला आहे. हाँगकाँगमधील तयार कपड्यांचे व्यापारी व कारखानदार ह्या दिशेनें जोराचे प्रयत्न करीत आहेत. युरोपमधील बाजारपेठांतून वसंत ऋतूंत वापरावयाच्या तयार कपड्यांची विक्री करण्याचा त्यांचा मानस आहे. युरोमधील तयार कपड्यांच्या व्यापाऱ्यांबरोबर सरळ सौदे करण्याच्या खटपटींत ते आहेत. ब्रिटन, अमेरिका, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इत्यादि देशांतून "डिपार्टमेंट स्टोअर्स" ह्या पद्धतीचीं प्रचंड दुकानें असतात. ह्या दुकानाच्या मालकांना तयार कपडे पुरविण्याची तयारी हाँगकाँगमधील व्यापाऱ्यांनीं दाखविली आहे. पश्चिम युरोपांतील देशांना तयार कपडे निर्यात करण्याचें भारताला जमण्यासारखें नाहीं. तरीपण पश्चिम व दक्षिण आशिआंत ते पाठवितां येण्यासारखे आहेत.

## कांगारूच्या कातड्याचे बूट

कांगारूच्या कातड्यापासून तयार केलेले बूट अमेरिकेंत फार लोकप्रिय झाले आहेत. आतां ही आवड पसरत चालली असून ऑस्ट्रेलिआंतील बुटांच्या कारखानदारांकडे कॅनडा, मेक्सिको व जपान ह्या देशांच्याहि मागण्या येऊं लागल्या आहेत. सिडने येथें एक व्यापारी प्रदर्शन नुकतेंच भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनांत कांगारूचें कातडें कमाविण्याचें प्रात्यक्षिक करून दाखविण्यांत येत होतें. परदेशांतून आलेल्या प्रेक्षकांची प्रात्यक्षिकांच्या गाळ्यापुढें नेहमींच गर्दी असे. तथापि, कांगारूच्या कातड्याचे बूट खुद्द ऑस्ट्रेलिआंत फारसे लोकप्रिय झालेले नाहींत. एकतर त्याची किंमत जास्त आहे, आणि दुसरे म्हणजे हे बूट दिसण्यांत आकर्षक दिसत नाहींत.

## ऑस्ट्रेलिआला झालेल्या नफ्यांत घट

१९६१ सालीं ऑस्ट्रेलिअन क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेला होता. ह्या दौऱ्यांत ऑस्ट्रेलिआला २९,२०० पौंड फायदा झाला. १९५६ सालीं ऑस्ट्रेलिअन संघाच्या दौऱ्याला ४२,०५७ पौंड नफा झाला होता. १९५३ सालचा नफ्याचा आंकडा ६५,६९६ पौंड होता. १९६१ सालीं खर्च वाढल्यामुळें नफा कमी झाला. पहिल्या दर्जाच्या सामन्यांचें एकूण उत्पन्न २,७२,०५४ पौंड झालें. त्यांपैकी ७७,७१९ पौंड ऑस्ट्रेलिआला मिळालें. दुसऱ्या दर्जाच्या सामन्यांपासून ऑस्ट्रेलिआला सुमारें १,६०० पौंड मिळाले असा अंदाज आहे. कसोटी सामन्यांच्या उत्पन्नाच्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं १९५६ सालीं ऑस्ट्रेलिआला १९६१ सालच्या मानानें खूपच नफा मिळाला होता.

## अविकसित देशांची प्रगति म्हणजे मनोराज्य नाहीं

पश्चिम जर्मन पार्लमेंटचे सभासद आणि भारतामधील माजी वकील डॉ. अर्नेस्ट मायर एसेन येथें बोलतांना म्हणाले कीं जगांतील मागासलेल्या व अविकसित देशांतील जीवन ३०–४० वर्षांच्या अवधींत युरोपच्या पातळीवर आणण्याच्या योजना म्हणजे केवळ मनोराज्य नाहीं. युरोपला सध्यांची भरभराट घडवून आणण्यासाठी १५० वर्षें लागलीं म्हणून वरील योजना कल्पनासृष्टींतील वाटतात इतकेंच. ह्या बाबतींत रशिआचें उदाहरण बघण्यासारखें आहे. गेल्या ४० वर्षांत रशिआनें केलेली औद्योगिक प्रगति आश्चर्य करण्यासारखी आहे. रशिआच्या उदाहरणाचा अप्रगत देशांवर फार परिणाम होतो. म्हणून आशिआ, आफ्रिका व दक्षिण अमेरिका ह्या खंडांतील अप्रगत देशांना आर्थिक मदत देण्याचें नैतिक बंधनच पाश्चात्य देशांवर आहे.

### राजस्थानांतील शेतीच्या पाणीपुरवठ्याची योजना

हिंदमधील वाढती लोकसंख्या व अन्नधान्याचें व शेतीचें उत्पादन यांच्यांतील व्यस्त प्रमाण गेल्या कांहीं वर्षांत स्पष्ट झालें आहे. लोकसंख्येच्या प्रश्नाचा अभ्यास करणारे डॉ. चंद्रशेखर यांच्यासारखे तज्ज्ञ कुटुंबनियोजनाच्या आवश्यकतेबद्दल संधि मिळेल तेव्हां सशास्त्र माहिती देत असतात. पण ही प्रश्नाची एक बाजू झाली. लोकसंख्येच्या नियंत्रणाबरोबरच शेतीच्या उत्पादनांत वाढ करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत हें उघड आहे. लागवडी-खालीं असलेल्या जमिनींतील दर एकरी पीक वाढविणें आणि नवीन जमीन लागवडीखालीं आणणें हें उत्पादन वाढविण्याचे दोन राजमार्ग म्हणून सांगितले जातात. हिंदुस्थानांत राजस्थानच्या पश्चिम भागांत पाण्याच्या अभावीं शेती करतां येत नाहीं; म्हणून सिंधू नदीच्या खोऱ्यांतील पाणी कालव्यानें त्या भागांत पोंच-विण्याची राजस्थान कालवा-योजना आखण्यांत आली आहे. ही योजना शेतीला पाणीपुरवठा करणारी देशांतील सर्वांत मोठी योजना आहे. राजस्थानांत आणलेल्या मुख्य कालव्यांतील पाणी छोट्या वांटप कालव्यांनून सोडण्यास आतां प्रारंभ झाला आहे. राजस्थानांतील एका भागांत २०,००० एकर जमिनीला ह्या योजनेमुळें पाणीपुरवठा करतां येणार आहे. योजनेला एकूण खर्च सुमारें २०० कोटी रुपये येणार आहे. राजस्थानमधील मुख्य कालव्याचें काम दोन टप्प्यानें पुरें करण्यांत येणार आहे. हा कालवा पुरा होण्यास १९६८-६९ साल उजाडेल असा अंदाज आहे. योजनेचा दुसरा टप्पा पुरा होण्यास १५ वर्षांचा काळ लागणार आहे. सर्व योजना पूर्ण झाली म्हणजे ३६ लाख एकर जमिनीला निश्चित पाणीपुरवठा होऊं शकेल. त्यामुळें शेतीच्या उत्पादनांत दरसाल २७ लाख टनांची भर पडेल. त्याची किंमत ६६ कोटी रुपये होईल.

---

### छोट्या उद्योगधंद्यांच्या यांत्रिकीकरणाची जरूरी

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन ह्या संघटनेतर्फे दिल्ली येथें छोटे उद्योगधंदे व हस्तव्यवसाय ह्यांच्या तांत्रिक बाजूबद्दल विचार करण्याकरतां एक बैठक बोलावण्यांत आली होती. संघटनेनें आपला तात्पुरता अहवाल पुरा केला आहे. छोट्या उद्योगधंद्यांचें उत्पादन व त्यांची उत्पादनपद्धति सुधारण्यासाठी त्यांचे यांत्रिकी-करण करण्यांत आलें पाहिजे असें मत अहवालांत व्यक्त करण्यांत आलें आहे. अहवालांत पुढें असें म्हटलें आहे कीं यांत्रिकीकरण ही छोट्या उद्योगधंद्यांची एक तांतडीची गरज आहे. तथापि यांत्रिकीकरण घडवून आणतांना कांहीं सावधगिरी दाखविणें अगत्याचें आहे. यांत्रिकीकरणाची गति फार असता कामा नये. प्रचलित समाजपद्धतींत जोराची उलथापालथ होणार नाहीं अशा बेताने यांत्रिकीकरणावर नियंत्रण ठेवण्यांत आलें पाहिजे. त्याचप्रमाणें यांत्रिकीकरणामुळें कमींत कमी बेकारी होईल अशीहि काळजी घेण्यांत आली पाहिजे. यांत्रिकीकरण सुलभतेनें व्हावें म्हणून व्यक्तींनीं व संबंधित संस्थांनीं लोकांना त्याचे फायदे पटवून देण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. सरकारनें यांत्रिकीकरणाचे फायदे दाखविण्यासाठी प्रात्यक्षिकांची व्यवस्था केली पाहिजे. बैठकींत एका उच्च तज्ज्ञानें आपले विचार व्यक्त केले. तो म्हणाला कीं छोट्या उद्योगधंद्यांतील यांत्रिकीकरणांत उद्भवणारे प्रश्न सर्व देशांत सारखेच आढळून येतात; मग तो देश प्रगत असो अगर अप्रगत असो. ह्या प्रश्नांपैकी सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दीर्घ मुदतीच्या भांडवलाचा तुटवडा. छोटे उद्योगधंदे चालविण्यासाठी लागणारीं वाकबगार माणसेंहि पुरेशी उपलब्ध होत नाहींत.

**आंध्र प्रदेशांत कॉफीची लागवड**—आंध्र प्रदेशांत २०,००० एकर जमिनींत कॉफीची लागवड करण्याच्या एका योजनेचा राज्य सरकार विचार करीत आहे. ह्या योजनेसाठी १० कोटी रुपये खर्च येणार आहे. राज्यांतील आदिवासी लोकांच्या कल्याणासाठी ४०० एकर जमिनींत कॉफीची लागवड करण्याचें काम राज्य सरकारच्या जंगल खात्यानें चालू केलें आहे. त्या-शिवाय आणखी २०७ एकरांत कॉफी लावण्यांत आली आहे.

**हिंदी शिक्षकांना प्रशिक्षण**—केरळ आणि म्हैसूर राज्यांत हिंदीच्या शिक्षकांना प्रशिक्षण देणारें एकेक कॉलेज काढण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें ३·५९ लाख रुपये मदत दिली आहे. केरळ-साठी २·४५ लाख व म्हैसूरसाठी ८४,००० रुपये मदत देण्यांत आली आहे. ह्या दोन्हीं कॉलेजांत मिळून २०० हिंदी शिक्षकांची सोय होईल. बिगर-हिंदी राज्यांतून हिंदीच्या प्रसाराला उत्तेजन देण्याचा हा एक भाग आहे.

**ऊंस शेतकऱ्यांना चिंता**—साखर कारखान्यांच्या लवकरच सुरू होणाऱ्या हंगामांत साखरेचें उत्पादन १० टक्क्यांनीं कमी करण्याचा वटहुकूम भारत सरकारनें काढला आहे. त्यामुळें ऊंस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांत चिंतेचें वातावरण पसरलें आहे. खाजगी साखर कारखाने पूर्वी केलेले करार मोडून शेतकऱ्यांचा ऊंस घेण्याचें प्रमाण कमी करतील अशी भीति त्यांना वाटत आहे.

**परदेशी पाहुण्यांची सोय**—१९६१ च्या पहिल्या सहा महिन्यांत भारताला ७५,५०८ परदेशीय पाहुण्यांनीं भेट दिली. गेल्या वर्षी ह्याच काळांत ५९,२८६ पाहुणे आले होते. परदेशी पाहुण्यांना उतरण्यासारख्या हॉटेल्सचा मुंबई शहरासारख्या शहरांत तुटवडा भासत आहे. ह्यावर उपाय म्हणून योग्य अशा कुटुंबांकडे पेइंग गेस्ट म्हणून त्यांची सोय करण्याचा विचार चालू आहे. भारतांत आलेल्या प्रवाशांपैकी ५० टक्के तरी मुंबईला भेट देतातच.

**अमेरिकेलाहि लोकसंख्येचा धोका**—अमेरिकेंतील स्त्रियांत विवाह न करतां एकटे राहणाऱ्या स्त्रियांची संख्या घटत चालली आहे. त्यामुळें अमेरिकेची लोकसंख्या प्रचंड प्रमाणांत वाढण्याचा धोका उत्पन्न झाला आहे, असें मत प्रिन्स्टन विद्यापीठांतील लोक-संख्या विषयाच्या तज्ज्ञानें प्रकट केले आहे. जगांतील १०० कोटी मुलांच्या आरोग्याबद्दल व शिक्षणाबद्दल ते बोलत होते.

**हिंदी शास्त्रज्ञांचें संशोधन**—कोइमतूर येथील ऊंस-संशोधन केंद्रांत काम केलेले शास्त्रज्ञ श्री. नरसिंहराव ब्रिटनमध्यें पिकांवर पडणाऱ्या कीटकांसंबंधीं महत्त्वाचें संशोधन करीत आहेत. त्यांना संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेतकी उपसंघटनेतर्फे शिष्यवृत्ति मिळालेली आहे. ऊंस, मिरची, टोमॅटो, बटाटे, इत्यादि पिकांवर पडणाऱ्या किडीसंबंधीं ते संशोधन करीत आहेत.

**छोट्या उद्योगधंद्यांना वाव**—स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असो-सिएशनचे उपाध्यक्ष श्री. मुलीक ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, कच्च्या मालाचा तुटवडा व त्यावर सरकारनें बसविलेलीं नियंत्रणें छोट्या उद्योगधंद्यांच्या वाढीला पोषकच म्हणतां येतील. सरकारी नियंत्रणें व तुटवडा नसता तर मोठ्या उद्योगधंद्यांनीं छोट्या उद्योगधंद्यांना औद्योगिक जीवनांतून उठवले असते.

**अमेरिकन ग्रंथकाराचा विवाह**—सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक अप्टन सिंक्लेअर आपल्या ८३ व्या वर्षी पुन्हां विवाहबद्ध होणार आहेत. ७९ वर्षांच्या एका विधवेशीं लग्न करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. गेल्या एप्रिलमध्यें त्यांची पहिली पत्नी वयाच्या ७८ व्या वर्षी निधन पावली. 'ड्रॅगन्स टीथ' हें त्यांचें पुस्तक बरेंच गाजलेलें आहे.

# विविध माहिती

**इंडिअन ऑइल कंपनी**—भारत सरकारच्या मालकीच्या इंडिअन ऑइल कंपनीनें तेलाचा पुरवठा करणारीं १७ केंद्रें मुंबई व दिल्ली मिळून उघडलीं आहेत. ह्यापैकीं दोन दिल्लींत असून १५ मुंबईत आहेत. ह्या केंद्रांतून डिझेल तेलाचा पुरवठा फक्त घाऊक ग्राहकांना करण्यांत येईल. तेल रशिआंतून आयात केलेलें असून तें जगांतील सर्वोत्कृष्ट तेल असल्याचे सांगण्यांत येत आहे. तेलाची किंमत रुपयांत देण्यांत आली आहे.

**ऑनररी मॅजिस्ट्रेटस्‌साठीं वर्ग**—अमेरिकेंतील भारताचे माजी वकील श्री. एम्. सी. छगला मुंबईत त्यांच्या एका सत्कार-प्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं, ऑनररी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटस्‌ना अधिक अधिकार देण्यांत यावेत. त्यांना आपलें काम अधिक चांगल्या रीतीनें करतां यावें म्हणून कायदाविषयक अभ्यास वर्ग काढून त्यांत पाठ देण्यांत यावे. त्यामुळें त्यांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

**पोलिओ रोगप्रतिबंधक लस**—गेल्या उन्हाळयांत दिल्ली-मध्यें पोलिओ रोगाची सांथ पसरली होती. त्यावेळीं दिल्लींतील कांहीं वैद्यकीय संस्थांनीं रशिआच्या रेड क्रॉस सोसायटीकडे पोलिओ प्रतिबंधक लस पाठविण्याची विनंती केली होती. रशिअन रेडक्रॉसकडून त्याप्रमाणें लस आली आहे मुलांना लस टोचण्याचें काम लवकरच सुरू होईल.

**मद्रास राज्यांत साखरेचे कारखाने**—मद्रास राज्यांत साखरेचे सहा नवीन कारखाने काढण्यास परवाने देण्यांत आले आहेत. राज्यांत साखरेचे ८ कारखाने असून ते सर्व मिळून रोज ८,२५० टन ऊंस गाळूं शकतात. १९६०–६१ सालीं मद्रास राज्यांत १,२७,००० टन साखरेचें उत्पादन करण्यांत आलें. मद्रास सरकारनें एक सहकारी साखर कारखाना काढण्याची शिफारस मध्यवर्ती सरकारला केली आहे.


**जनरल फ्रँकोच्या राजवटीला २५ वर्षें**—स्पेनचा सध्यांचा हुकूमशहा जनरल फ्रँको ह्यानें आपल्या राजवटीचा २५ वा वर्ष-दिन साजरा केला. १९३६ सालीं स्पेनमध्यें उफाळलेल्या यादवी युद्धांत त्यानें समाजवादी सरकारचा पराभव करून सत्ता बळका-वली. स्पेनच्या यादवी युद्धांत बऱ्याच युरोपीय देशांनीं अनधिकृत-रीत्या भाग घेतलेला होता.

**टोळयांची भाषा शिका**—आसाममधील गॅझेटेड नोकरांना शिकावयाच्या भाषाबद्दल राज्य सरकारनें नवीन हुकूम काढला आहे. गॅझेटेड अधिकाऱ्याची मायभाषा आसामी असेल तर त्याला त्या भाषेशिवाय बंगाली व एखादी जंगली टोळीची भाषा शिकावी लागेल. अधिकारी बंगाली असेल तर त्याला आसामी व टोळयांच्या भाषेपैकीं एखादी भाषा शिकावी लागेल.


५०
वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
★ सरदारगृह ★
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



बेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.
गिरगांव, मुंबई ४.

किर्लोस्कर
स्थापना १८८८
इलेक्ट्रिक पंपिंग सेट

भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्या-साठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

## पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हन्टस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें

या बँकेची वार्षिक साधारण सभा दि. २४-९-६१ रोजीं होऊन त्यामध्यें सन १९६१-६२ सालाकरितां पुढील पदाधिकारी यांची अविरोध निवड झाली.

(१) सल्लागार मंडळ:—(१) मा दत्तात्रय लक्ष्मण भडगांवकर, अध्यक्ष (२) मा. पांडुरंग धोंडिबा सोनवणे, उपाध्यक्ष (३) मा. सिताराम धोंडिबा आवनावे, (४) मा. मधुकर चिंतामण तिखे, (५) मा. भिमराव विष्णू पाटील.

(२) कार्यकारी मंडळ: (१) मा. कृष्णाजी गोपाळ कुंभार, कार्याध्यक्ष. (२) मा. सत्याश्रय गणेश मिसाळ, उपकार्याध्यक्ष. (३) मा. रंगनाथ विष्णुपंत उंडाळे, (४) मा. शरफुद्दीन हफिझुद्दीन काजी, (५) मा. दत्तात्रय नाना कुंभार, (६) मा. पुरुषोत्तम कृष्णा कुलकर्णी, (७) मा. वसंत रामकृष्ण कोतवाल, (८) मा. मधुकर मारुती खोले, (९) मा. कृष्णराव दगडोबा घारमळकर, (१०) मा. नामदेव धोंडिबा भोकरे, (११) मा. शांताराम भिमाजी वाडेकर.

(३) ऑडिटर:—मा. शरद नारायण देशपांडे.

सभासदांना डिव्हिडंड सव्वासहा टक्के व रिबेट नियमाप्रमाणें बारा टक्के याप्रमाणें नफावांटणी मंजूर करण्यांत आली.

---

### गुजरात राज्यांत भारी एंजिनिअरिंगचा कारखाना

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत गुजरात राज्यांत मूलभूत स्वरूपाचे उद्योगधंदे काढण्याच्या बाबतींत दुर्लक्ष झालें आहे अशी तक्रार त्या राज्यांतील उद्योगपतींतर्फे केली जात होती. मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं ह्या तक्रारींचें निवारण केलें आहे. गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सपुढें बोलतांना ते म्हणाले कीं, गुजरात राज्यांत एक एंजिनिअरिंगचा मोठा कारखाना काढण्यांत येण्याची शक्यता आहे. तो सार्वजनिक मालकीच्या विभागांत स्थापन करण्यांत येईल. हिंदचा विकास समतोलपणें घडवून आणण्याचें सरकारचें धोरण असल्यामुळें सर्व राज्यांतील उद्योगधंद्यांचा विकास न्याय्य रीतीनें साधण्यांत येईल. ज्या राज्यांतून सध्यां भारी उद्योगधंदे नाहींत त्या राज्यांतून ते स्थापन करण्यासाठी अग्रहक्क देण्यांत येईल. पुढील पंचवार्षिक कार्यक्रमाची आंखणी त्या दृष्टीनें करण्यांत येईल.

---

### रणगाडे तयार करण्याचा कारखाना

भारताच्या लष्करासाठी रणगाडे तयार करण्याचा सरकारचा विचार असून त्यासाठी उभारावयाच्या कारखान्याची प्राथमिक तयारी भारतांत व ब्रिटनमध्यें चालू आहे. मेसर्स व्हिकर्स आर्मस्ट्रॉंग ह्या प्रसिद्ध कंपनीचें सहकार्य ह्या कामीं लाभणार आहे. कारखाना मद्रास राज्यांत आवडी येथें काढण्यांत येणार अशी वार्ता होती. पण आतां तो कलकत्ता भागांत कोठेंतरी काढण्यांत येणार असल्याचें समजतें. भारतानें संकल्पित कारखान्याच्या स्थापनेसाठी कांहीं जर्मन कंपन्यांशींहि वाटाघाटी केल्या होत्या. जर्मन-कंपन्यांनीं केलेल्या कांहीं सूचना भारताच्या लष्करी प्रतिनिधींना उपयुक्त वाटल्या. रणगाड्यांचा नमुना ठरवितांना जर्मन कंपन्यांनीं केलेल्या सूचनांचाहि विचार करण्यांत येणार आहे.

### लँड मॉर्गेज बँकांच्या कामकाजाचें वातावरण

"जमीन सुधारणा अगर इतर कारणांकरितां जें आपण कर्ज देतों त्यासंबंधीं वेळोवेळीं जीं धोरणें व बंधनें घातलीं जातात, त्यांत बदल करावयाचा झाल्यास त्याचा फार खोलवर विचार करावयास हवा. जमिनींतून जास्तींतजास्त उत्पादन निघण्यासाठी व कर्जविमोचनासाठी लँड मॉर्गेज बँकेचा जन्म झाला. उत्पादन-वाढीकरितां प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशीं बरीचशीं कारणें आहेत. पर्यायानें शेतकऱ्याला कर्जमुक्त करून त्यास मानसिक स्वास्थ्य देऊनहि उत्पादनशक्ति वाढवितां येते. चालू परिस्थितींत शेतकऱ्यांस सावकार कर्ज देत नाहीं अगर कोणतीहि बँक देऊं शकत नाहीं. सहकारी संस्था अगर सरकारच त्यांस कर्ज देऊं शकतें. देशामध्यें सरकार, सहकारी संस्था व आपण सर्वजण शेतीचें उत्पादन वाढविण्याचे दृष्टीनें सुसंघटितपणें प्रयत्न करीत असतों. अल्प मुदतीचें कर्ज व दीर्घमुदतीचें कर्ज यांचा फार निकटचा संबंध आहे.

"आपण पाहतोंच कीं अल्प मुदतीचे कर्जाचे प्रमाणांत दिवसेंदिवस वाढ होत असून तें एकरी १,२०० रु. पर्यंत गेलेलें आहे. ज्या भागांत कॅनॉलस् आहेत त्या भागांतील शेतकरी त्याचा भरपूर फायदा घेतो परंतु ज्या शेतकऱ्याचे जमिनीजवळ कॅनॉल नाहीं, विहीर नाहीं, अशा शेतकऱ्याला दुर्दैवानें थोडाबहुत सोसायटीचा बोजा असल्यास अगर तगाईची बाकी असल्यास अगर पांच वर्षांपूर्वींचें कर्ज असल्यास वरिष्ठ बँकेच्या बंधनामुळें आपणांस कर्ज नाकारावें लागतें. शेतकऱ्यास बैलाकरितां जर कर्ज झालें असलें तर तेंहि नाकारण्याची प्रवृत्ति आहे. वास्तविक पहातां शेतकी धंदामधील बैल हा त्या धंद्यांतील कणा असल्याचें समजण्यांत येतें. परंतु हेंहि अलीकडे नाकारलें जातें. जिवापाड जतन करून ठेवलेल्या जमिनीचे तारणावर शेतकरी कर्ज मागतात. त्यांना आम्ही आकाराची पट, सिलिंग कायदा, सावकारी नियंत्रण कायदा, तुकडेबंदी कायदा, जमिनीचे मालकी हक्क, एक ना दोन जितक्या कांहीं अडचणी लावतां येतील तितक्या लावून त्याला भेडसावण्याची प्रवृत्ति आहे, असा लँड मॉर्गेज बँकेबाबत बहुजन समाजाचा व तज्ज्ञ लोकांचाहि समज आहे. या सर्वच वातावरणांतून मुक्त करण्याच्या दृष्टीनें सहकारी चळवळींतील, विशेषत: लँड मॉर्गेज बँकेकरितां एक स्वतंत्र कायदा व्हावा म्हणून फार दिवसांची मागणी होती. आपल्या राज्याचा १९२५ चा सहकारी कायद्याऐवजीं १९६१ चा २४ वा नवीन सहकारी कायदा पास होऊन त्यास राष्ट्रपतींची गेल्या मे मध्यें मंजुरीहि मिळालेली आहे.

"या नव्या कायद्यांत जमीनसुधारणा बँकांचा एक स्वतंत्र विभाग घातलेला असून इत:पर पूर्वीच्या लँड मॉर्गेज बँकांना जमीनसुधारणा बँक असें संबोधण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. या कायद्यांत बऱ्याचशा तांत्रिक अडचणी व लँड मॉर्गेज बँकांचा कर्जाच्या वसुलीबाबतची तरतुदी वगैरे अनेक अंग-उपांगें असून यासच स्वतंत्र कायदा असें म्हणण्यास हरकत नाहीं असें मला वाटतें. हा कायदा अद्याप लागूं होणेचा आहे. तो लागू झाल्यानंतर कामकाजांतील बऱ्याचशा अडचणी दूर होतील असें वाटतें. तथापि त्यांत जुनें कर्ज भागविण्याच्या बाबतींत विशेष असा उल्लेख दिसून येत नाहीं. अनुभवाअंतीं जरूर तर कायद्यांत दुरुस्तीहि करतां येईल, असें वाटतें."

—सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेचे चेअरमन, श्री. नीलकंठ आण्णाप्पा कल्याणी ह्यांचें वार्षिक सभेंतील भाषण.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.